# प्रेसनोट दिनांक १०/०७/२०१९
## समर्थ पोलीस ठाणे पुणे
## सांगली येथील चोरी केलेली मोटार सायकलसह एकास समर्थ पोलीसांनी घेतले ताब्यात.

दिनांक ८/७/२०१९ रोजी पो.शि.८२०३ पवार,,पो.शि.७८९१ कोळी, पो.शि.९९४३ घनवट व पोहवा. संतोष काळे असे मिळून वाहन चोरीस प्रतिबंध व्हावा म्हणून समर्थ पोलीस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलिंग करीत फिरत असताना राजा धनराजगिरी हायस्कूल जवळ १७/३० वा. चे दरम्यान येथे आले होते. तेथे ताराचंद हॉस्पिटल कडुन एक व्यक्ती बजाज डिस्कव्हर मोटार सायकल नं. एम.एच.१२/ अेएल -४७०९ यावरुन जाताना पोलीस शिपाई ८२०३ पवार यांना दिसला. त्यास त्यांनी तपासणीकामी थांबवले. त्याच्याकडे वाहन परवाना आणि वाहनाच्या नोंदणीच्या कागदपत्रांची मागणी केली . परंतु सदरचा व्यक्ती हा गाडीचे कागदपत्र माझेकडे नाही असे म्हणाला . त्याला पोलीसांनी त्याचा संपुर्ण नाव पत्ता विचारला त्याने आपले नाव - गणेश अनिल कांबळे रा. जुना काळभैरव मंदीरा शेजारी कसबा पेठ असे असल्याचे सांगितले. पंरतु त्याचे ताब्यात असेलेली बजाज डिस्कव्हर गाडी नं. एम.एच.१२/ अेएल- ४७०९ हीचा चॅसिस नं MD2DSPAZZUWE65212 व इंजिन नं. JBMBUE05958 विषयी खात्री केली असता ती चोरीची असल्याबाबत दाट संशय आल्याने अधिक चौकशी कामी मोटार सायकल सह त्यास समर्थ पोलीस स्टेशन येथे आणले.

त्याला विश्वासात घेवुन अधिक चौकशी केली असता तो असमाधानकारक उत्तरे देवु लागल्याने सदरची मोटार सायकल त्याने चोरी करुन वापरत असल्याचा दाट संशय आल्याने गणेश कांबळे याचे ताब्यात मिळालेली मोटार सायकल ही पोलीस हवालदार संतोष काळे कि.रु.१५०००/- ची यांनी जप्त केली व त्याला सी.आर.पी.सी. ४१ (१)(ड) प्रमाणे २०/३० वा. ताब्यात घेतले. त्याच्या कडे केले तपासामध्ये त्याने सदरची मोटार सायकल ही जुनी व रु.१००००/- या किंमतीस विकत घेतली असल्याचे सांगितले. परंतु सदर वाहनाची चोरीस गेलेले वाहनांचे अभिलेखातून माहिती पोलीस शिपाई सचिन पवार यांनी प्राप्त केली . तेव्हा सदर मोटार सायकल ही विश्रामबाग पोस्टे , सांगली शहर येथून चोरीस गेलेबाबत गुन्हा नोंद क्र. २०१/२०१७ भादवि.क. ३७९ प्रमाणे गुन्हा नोंद असल्याचे त्यांना समजले. ताब्यात घेतलेले गणेश कांबळे कडे अधिक चौकशी करता तो देखील मूळचा चिंतामणीनगर, सांगली येथील असल्याचे उधड झाले. यामुळे सदरची मोटार सायकल ही त्याने सांगली येथून चोरी करुन घेऊन येवून वापर करीत असल्याचे आढळून आले . सदर मोटार सायकलबाबत अधिक सखोल तपास पोलीस हवालदार संतोष काळे हे करीत आहेत.